**नि. दिवाणी दावा क्र. १९७ /२००४**

देबनाथदास वि. सिडको

नि.क्र. ८२ पुढे सुरू

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ विधीज्ञ श्रीमती तृप्ती नाईक यांचेमार्फत सुरु–</u>**

१. मला आता दि. २२/१२/२०२५ रोजीचे अथोरीटी लेटर दाखविण्यात आले. त्यावर सिडको अधिका–यांची सही आहे ती मी ओळखतो. सदरचे अथोरेटी लेटर माझ्या नावे देण्यात आलेले आहे. त्यांस **नि.क्र.८४** देण्यात आले. मला आता दि.२०/०७/१९९८ रोजीच्या अर्जाची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यावर वादीची सही आहे. सदरचा दस्त हा आमच्या रेकॉर्डवरील दस्त असल्यामुळे त्यास निशाणी देण्यात यावी. वादीने दस्त मान्य केल्याने त्यांस **नि.क्र.८५** देण्यात आले. मला आता फ्लेक्सी टाईम फ्लेक्सी पे स्कीम ची अटी व शर्थींची छायांकीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **आटिकल ए** देण्यात आले. मला दि. २१/०७/१९९८ रोजीचे लेटर ऑफ इंटेन्टची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. सदरचा दस्त याअगोदर नि.क्र.३६ वर निशाणीकृत करण्यात आलेला आहे. सबब, दस्तास **नि.क्र. ८६** देण्यात आले. मला दि. २२/०९/१९९८ रोजीचे लेटर ऑफ इंटेन्टची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. सदरचा दस्त याअगोदर नि.क्र.३७ वर निशाणीकृत करण्यात आलेला आहे. सबब, दस्तास **नि.क्र.८७** देण्यात आले. मला आता कुलमुखत्यार पत्राची प्रमाणीत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र. ८८** देण्यात आले. मला आता ताबा पावतीची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र. ८९** देण्यात आले. मला दि. १८/११/१९९८ रोजीच्या पत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र.९०** देण्यात आले. मला दि. २८/०४/१९९९ रोजीच्या पत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र.९१** देण्यात आले. मला दि. २५/१०/१९९९ रोजीच्या पत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र.९२** देण्यात आले. मला दि. १०/०४/२००० रोजीच्या पत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र.९३** देण्यात आले. मला

दि. २२/०६/२००१ रोजीच्या पत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र.९४** देण्यात आले. मला दि. १४/०९/२००४ रोजीच्या पत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यांस **नि.क्र.९५** देण्यात आले.

**<u>उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. पी. बोराडे यांचेमार्फत सुरु–</u>**

२.  हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ८४ वरील दस्तावर सिडको चा शिक्का नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सिडकोचा ठराव दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा प्रतिवादी यांनी दिलेल्या दुकानाच्या जागेच्या फरकाविषयी आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने दिलेला अर्ज हा आमच्याकडील प्रिन्टेड फॉर्ममध्ये उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ८५ वरील अर्जामध्ये ग्रॉस बिल्डअप एरीया स्केअर फीट हा छापील मजकुर आहे. नि.क्र. ८६ वरील पत्रामध्ये बिल्डअप एरीया असा उल्लेख आहे, ग्रॉस बिल्डअप एरीया स्केअर फीट असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीला दिलेला गाळा हा १२०० रुपये प्रति क्वेअर फिट या दराने दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ताबा पावती वादीच्या हक्कात देईपर्यंत कोणताही करारनामा वादीला दिला नव्हता. हे मी आता सांगू शकत नाही की, वाद मिळकतीच्या जागेबाबतचा कागद नकाशासोबत वादीला दिला नव्हता. नि.क्र. ८९ वरील ताबा पावती प्रमाणे ताबा घेतांना वादीने फिटींग, फिक्चर्स एमिनीटीज, आणि प्रिमाईसेसे तपासून घेतला असे नमुद केलेले आहे. दि.१८/११/१९९८ नि.क्र.९० आणि ९१, ९२, ९३ आणि ९४ वरील नोटीस वजा पत्र वादीला मिळाले याबाबतचा कोणताही पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादींना सदरची रक्कम ३६ हफ्त्यामध्ये ऑक्टोबर १९९८ पासून देण्याचे ठरले होते. साक्षीदार सांगतो की, पहिला हफ्ता दिल्यानंतर हफ्ते देण्याचे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, वादीने पहिला हफ्ता रुपये १,००,०००/– व ३० टक्के रक्कम म्हणजेच एकूण १,७५,८६०/– रक्कम प्रतिवादीला दि २२/०९/१९९८ पुर्वी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादीचा मासीक हफ्ता १४,४२८/– एवढा होता.

मध्यंतराराची वेळ झाल्यामुळे उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक. १३/०४/२०२६ (ओ. अ. साने)

बेलापुर २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर,

बेलापुर, नवी मुंबई.